**<u>उलटतपास शपथेवर प्रतिवादीतर्फे वकील श्री.ए.एल.डोंगे यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**१०.** माझे वडीलांचे नाव रामदास सुर्यवंशी हे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व वादी क्र.१ सुभाष हे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुभाष हे या प्रकरणात तारखेच्या दिवशी हजर असतात. मला एक भाऊ असून एक बहिण होती. माझी बहिण मीराबाई ही सन २००८ साली मयत झाली आहे. माझे बहिणीचा विवाह झाला होता. तिला एक मुलगी आहे. माझे बहिणीचे पती हयात आहेत. माझे बहिणीचे मुलीचे नाव विजयश्री असून ती सहा वर्षाची आहे. माझी बहिणीची मुलगी व बहिणीचे पती पुणे येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात माझे बहिणीची मुलगी व तिचे पती यांना पक्षकार केलेले नाही. साक्षीदाराला वादीने दाखल केलेला गट क्र.५७/१ चा ७/१२ उतारा दाखवला. ७/१२ ची प्रत प्रतिवादीतर्फे रेफर करण्यात आल्याने ७/१२ ला **<u>नि.क्र.४१</u>** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.४१ वरील ७/१२ हा दि.२७/०९/२०१९ रोजी काढण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.४१ वरील ७/१२ वर भोगवटदार वर्ग-१ म्हणून प्रतिवादीचे नाव नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, या ७/१२ उताऱ्यावर संरक्षीत कुळ म्हणून इतर हक्कात मोतीराम, हणमंता, चंद्रकांत, हरीकांत, गोदावरी, पार्वतीबाई, शोभाबाई, बेबी व गोविंद यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मोतीराम यांचा मुलगा गोवर्धन आजरोजी हयात आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोवर्धन याला दाव्यात पक्षकार केलेले नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, वादातील नि.क्र.१३ व १४ वरील खरेदीखत झाले, त्यावेळी माझे वय अंदाजे १० वर्षे असेल. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताच्या वेळी माझे वय लहान असल्याने मी घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी १० वर्षाचा असल्याने या खरेदीखतांच्या वेळी काय व्यवहार झाले, हे मला सांगता येणार नाहीत. दि.०४/०२/२००० व ०१/१०/२०१९ रोजी आम्ही तहसीलदार, अहमदपूर यांच्याकडे खरेदीखताआधारे फेरफार करण्यासाठी व वहिती अंमलसाठी अर्ज दिला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना नोटीस काढण्यात आली किंवा नाही याची मला माहिती नाही. या अर्जाच्या अनुषंगाने कोणताही आदेश झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी त्यांचे परिवारासह हैद्राबाद येथे १९९० सालापासून राहतात. दावा दाखल करताना मला प्रतिवादी हैद्राबाद येथे राहत असल्याचे माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीचा पत्ता दाव्यात शिरुर ताजबंद, ता.अहमदपूर असा नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हैद्राबाद येथे राहत असल्याने दावा दाखल

करेपावेता मागील २५ ते ३० वर्षात माझी भेट झाली नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, सन २०१९ चे अगोदरचे व नंतरचे ७/१२ दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वादातील खरेदीखताच्या पुर्वीपासून व खरेदीखतानंतर आजपावेतो मालकी हक्कात प्रतिवादीचे नावाची नोंद आहे. वादातील जमिनीचा पेरा आमचे नावे असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पुढच्या तारखेस मी दाखल करीन. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात मी खरेदीखताआधारे व प्रतिकुल ताब्याआधारे मालक म्हणून झाले असल्याचे जाहीर करुन मिळावे असा मजकूर नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८/१२/२०२१ रोजी प्रतिवादीने वादीचे कब्जेस इन्कार करुन त्यांना बेदखल करण्याची धमकी दिली अशी कोणतीही घटना झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९० पासून ते आजपावेतो दावा मिळकतीत आमचा ताबा नसल्याने सदरचा दावा मुदतीत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील खरेदीखत प्रतिवादीने माझे वडिलांना करुन दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१३ व १४ वरील खरेदीखते खोटे व बनावट आहेत, त्यावर प्रतिवादीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचा खरेदीखतापुर्वीपासून आजपावेतो दावा मिळकतीवर ताबा असून तो सालगडयामार्फंत दावा मिळकतीची वहिवाट व मशागत करतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.०४/०२/२००० व ०१/१०/२०१९ रोजी खरेदीखताप्रमाणे ७/१२ ला नोंद होण्यासाठी आम्ही अर्ज दिले नव्हते.

**१३.** माझे वडिलांचे शिक्षण १० वी पर्यंत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर आमचा ताबा नसल्याने प्रतिकुल ताब्याआधारे आम्हाला मालक म्हणून घोषीत करता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर आमचा ३० वर्षापासून ताबा असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर प्रतिवादी यांचा ताबा व कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.

दिनांक- २५/०९/२०२५